सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
## अवसरी (खुर्द), ता. आंबेगाव, जि. पुणे - ४१२४०५.

जा.क्र.शाअवसंमअ/विवि/२०२५/ 1327 दि. 28 MAR 2025

## प्रथम वर्षातील विद्यार्थ्यासाठी परीक्षा अर्ज भरणेबाबत महत्वाची सुचना

संदर्भ-:1. सा.फु.पुणे विद्यापीठ यांचे दि.27/03/2025 रोजीचे परीक्षा अर्ज भरणेबाबत प्रदर्शीत वेळापत्रक.
2. जा.क्र.शाअवसंमअ/विवि/2024/4222, दिनांक 12/12/2024.

उपरोक्त संदर्भीय क्र.1 च्या विषयान्वये महाविद्यालयातील प्रथम वर्षात (FE 2024 Patt.) प्रवेशित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून शैक्षणिक वर्ष 2024-25 चे सत्राचे Apr/May-2025 चे परीक्षा अर्ज भरून घेणे **दि.27/03/2025** पासुन सुरू झालेले आहे. तरी विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संकेतस्थळावर जावून Online पध्दतीने परीक्षा अर्ज भरावा. परीक्षा अर्ज भरण्यापुर्वी **Audit Course/Elective/Honours** विषयाबाबत संबंधित विभागाच्या मार्गदर्शनाने परीक्षा अर्ज भरावेत व त्यावर संबंधित शिक्षकाची सही घ्यावी. तसेच परीक्षा अर्जासोबत **SBI Collect** वर जावून परीक्षा फी भरावी व त्याची पावती आणि मागील वर्षीच्या सर्व गुणपत्रिका जोडून सदर अर्ज विद्यार्थी विभागाकडून तपासून तसेच रोखपाल कडून फी ची पावती तपासुन सदर परीक्षा अर्ज डी.पी.यु. या विभागात **दिनांक 04/04/2025** पर्यंत जमा करावा. विद्यार्थीनी यांनी परीक्षा अर्जासोबत बॅकेचे पासबुकच्या पहील्या पानाची व आधार कार्डच्या पहिल्या पानाची साक्षांकीत प्रत जोडावी.

तरी प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडून दिलेल्या विहित मुदतीत **दिनांक 04/04/2024** पर्यंत परीक्षा अर्ज भरून सादर करावा. अन्यथा विद्यापीठाकडून Late Fee लागू झाल्यास ती भरण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यांची राहील. तसेच परीक्षा अर्ज न भरल्यास होणा-या शैक्षणिक व आर्थिक नुकसानिस संबंधित विद्यार्थी जबाबदार असेल, तसेच College login मधून Exam form Confirm होणे आवश्यक आहे. अन्यथा परीक्षा अर्ज ग्राहय धरला जाणार नाही. याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

तसेच संदर्भ क्र. 2 नुसार शैक्षणिक वर्ष 2024-25 करीता सा.फु. विद्यापीठ, पुणे यांचेकडून प्रो-राटा (Pro-Rata) शुल्क मध्ये वाढ झाल्याने FE मधील प्रवेशित विद्यार्थ्यांनी रु.26/- (अक्षरी रुपये सव्वीस फक्त) भरण्याबाबत कळविण्यात आले होते, बऱ्याच विद्यार्थ्यांनी अद्यापर्यंत सदरचे (Pro-Rata) शुल्क भरलेले नाही . त्यानुसार (Pro-Rata) शुल्क FE मधील प्रवेशित विद्यार्थ्यांनी रु.26/- (अक्षरी रुपये सव्वीस फक्त) SBI Collect वरती (Uni.Pro-Rata) या रकान्यात भरुन त्याची पावती (Receipt) कार्यालयातील विद्यार्थी विभाग तसेच रोखापाल यांच्याकडे दोन प्रती मध्ये जमा करावी. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी (Pro-Rata) शुल्क याअगोदर भरलेले आहे. त्यांनी सुध्दा त्याची पावती

(Receipt) कार्यालयातील विद्यार्थी विभाग तसेच रोखापाल यांच्याकडे दोन प्रती मध्ये जमा करावी. जे विद्यार्थी (Pro-Rata) शुल्क भरणार नाही त्यांचे परीक्षा अर्ज स्विकारण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

28/03/2025

प्र.प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय,
अवसरी (खुर्द) ता.आंबेगाव जि.पुणे

प्रत-1. विभागप्रमुख- अणुविद्यूत/ उपकरणीकरण /संगणक /स्वयंचल / स्थापत्य /यंत्र /उपयोजित /कर्मशाळा यांनी सदर सुचना विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणून तसे सुचित करावे.

2. डी.पी.यु.यांनी सदर सुचना सर्व विभागप्रमुखांना मेल करावी. संकेतस्थळावर प्रदर्शित करावी.